RNI No. MAHBIL /2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - ४१ ] सोमवार, डिसेंबर २७, २०२१ / पौष ६, शके १९४३ [ पृष्ठे ३

**असाधारण क्रमांक ४१**

## प्राधिकृत प्रकाशन

**मुख्य निवडणूक अधिकारी तथा महानगरपालिका आयुक्त यांजकडून**

**सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका**

**प्रभाग क्रमांक १६-अ रिक्त पदाची पोट-निवडणूक - जानेवारी, २०२२**

**(मा. राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/ मनपा-२०२१/प्र.क्र.१८/का. ५, दि. १७ डिसेंबर २०२१ रोजीचे पत्र, त्यामधील संदर्भाधिन पत्रे व परिशिष्ट-१)**

***जाहीर सूचना***

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' प्रकरण-१ (निवडणूक नियम) मधील नियम क्रमांक ८ अन्वये**

क्रमांक मनपा/प्रशावि/पोट-निवडणूक-३१९/२०२१-२२.– मा. सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका क्रमांक ८४१/२०२१ मधील दिनांक १५ डिसेंबर २०२१ च्या निर्णयानुसार सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका प्रभाग क्रमांक १६-अ "नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग" हे रिक्त पद "सर्वसाधारण" करून पोट-निवडणूक घेण्याकरिता कार्यक्रम मा. राज्य निवडणूक आयोगाने संदर्भांकित आदेशानुसार खालीलप्रमाणे जाहीर केला आहे.

**निवडणूक कार्यक्रम**

| अ. क्र. | निवडणुकीचा टप्पा | | टप्पा सुरू करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|---|
| १ | २ | | ३ |
| १ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाची रिक्त जागा सर्वसाधारण जागा म्हणून अधिसूचित करण्यासाठी पूर्वी सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रसिद्ध केलेल्या अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करून त्याची अधिसूचना शासन राजपत्रात व स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध केल्याचा दिनांक | | २२-१२-२०२१ (बुधवार) |
| २ | महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्याची दिनांक. | .. | २७-१२-२०२१ (सोमवार) |
| ३ | नामनिर्देशन पत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरिता उपलब्ध असण्याचा कालावधी. | .. | दि. २७-१२-२०२१ (सोमवार) सकाळी ११.०० ते दि. ३-१-२०२२ (सोमवार) दुपारी २.०० पर्यंत. |

**निवडणूक कार्यक्रम--*चालू***

| १ | २ | | ३ |
|---|---|---|---|
| ४ | वरील नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्याचा कालावधी | .. | २७-१२-२०२१ (सोमवार) ते ३-१-२०२२ (सोमवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० पर्यंत). (दि. २-१-२०२२ रोजी रविवार असल्याने नामनिर्देशन पत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत). |
| ५ | नामनिर्देशन पत्रांची छाननी | .. | ४-१-२०२२ (मंगळवार) (सकाळी ११.०० पासून) |
| ६ | वैधरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक. | .. | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ७ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | .. | ६-१-२०२२ (गुरुवार) (दुपारी ३.०० पर्यंत) |
| ८ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | .. | ७-१-२०२२ (शुक्रवार) (सकाळी ११.०० पासून) |
| ९ | अंतिमरीत्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याचा दिनांक. | .. | ७-१-२०२२ (शुक्रवार) |
| १० | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | .. | १८-१-२०२२ (मंगळवार) (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत). |
| ११ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | .. | १९-१-२०२२ (बुधवार) (सकाळी १०.०० पासून) |
| १२ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करणे | .. | २०-१-२०२२ (गुरुवार) पर्यंत |

महानगरपालिका आयुक्त, सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचेकडील दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ व दिनांक १७ डिसेंबर २०२१ रोजीच्या आदेशान्वये उपरोक्त प्रभाग क्रमांक १६-अ या रिक्त पदाच्या पोट-निवडणुकीच्या निवडणूक कार्यक्रमानुसार जरूर ती कार्यवाही पार पाडण्याकरिता खालील तक्त्यातील रकाना क्रमांक २ मधील अधिकाऱ्यांची "निवडणूक निर्णय अधिकारी" (Returning Officer) म्हणून नेमणूक केली आहे.

| अ. क्र. | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे नाव व पद | | नामनिर्देशन पत्रांचे वाटप, स्वीकृती, छाननी, अर्ज मागे घेणे व इतर निवडणूकविषयक कार्यवाही करणेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | २ | | ३ |
| १. | श्रीमती विजया पांगारकर उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र. ९, जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली. | .. | जुने घरपट्टी ऑफिस, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर, स्टेशन चौक, सांगली-४१६ ४१६. |

उपरोक्त "निवडणूक निर्णय अधिकारी" यांच्याकडे निर्णयासाठी सुपूर्द करण्यात आलेल्या प्रभाग क्रमांक १६-अ च्या पोट-निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्रे (Nomination Papers) राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या **https://panchayatelection.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर भरण्याकरिता उपलब्ध असण्याचा कालावधी हा दिनांक २७ डिसेंबर २०२१ (सोमवार) सकाळी ११.०० ते दिनांक ३ जानेवारी २०२२ (सोमवार) दुपारी २.०० पर्यंत निश्चित केला आहे, तसेच वरील नामनिर्देशन पत्रे (Nomination Papers) स्वीकारण्याकरिता दिनांक २७ डिसेंबर २०२१ (सोमवार) सकाळी ११.०० ते दिनांक ३ जानेवारी २०२२ (सोमवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ३.००) पर्यंतच्या कालावधीत रकाना क्रमांक ३ मधील नमूद केलेल्या त्यांच्या संबंधित कार्यालयात स्वीकारण्यात येतील (रविवार, दिनांक २ जानेवारी २०२२ रोजी नामनिर्देशन पत्र स्वीकारण्यात येणार नाहीत).

वेबसाईटवर दिलेल्या नामनिर्देशन पत्राचा नमुना पूर्णपणे भरून त्याचे प्रिंटआऊट घेऊन त्यावर उमेदवाराने स्वाक्षरी करावयाची आहे, असे स्वाक्षरी केलेले प्रिंटआऊट नामनिर्देशन पत्रे व इतर अनुषंगिक कागदपत्रे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पद्धतीने दाखल करावयाची आहेत.

निवडणूक लढविण्याऱ्या उमेदवारांनी व राजकीय पक्षांनी निवडणूक दैनंदिन खर्चाचा हिशोब आयोगाने विकसित केलेल्या "ट्रू व्होटर" (True Voter) या अँड्राईड बेस मोबाईल ॲप्लिकेशनच्या माध्यमातून भरावयाचा आहे व त्या विवरण पत्राची प्रिंटआऊट काढून खर्चाच्या

प्रमाणकासह दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे न चुकता पाठवावयाची आहे. सदरचे ॲप्लिकेशन प्ले स्टोअरवर व **http://goo.gl/sx1Jek** या लिंकवर उपलब्ध आहे. सदरचा खर्च हाताने (Manually) भरण्यास परवानगी दिली जाणार नाही.

उपरोक्त प्रभाग क्रमांक १६-अ च्या पोट-निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्रासंबंधी व इतर सर्व निवडणूकविषयक कार्यवाही "निवडणूक निर्णय अधिकारी" यांच्या उपरोक्त रकाना क्रमांक ३ मध्ये दर्शविलेल्या कार्यालयात होईल.

**नितीन कापडणीस,**
मुख्य निवडणूक अधिकारी तथा
महानगरपालिका आयुक्त,
सांगली-मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली.

सांगली, २४ डिसेंबर, २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.